# पुढे धोका आहे!




चित्र : रोहन पोरे

**प्रथमेश राणे**, कॉलेज क्लब रिपोर्टर
muntainbox@gmail.com

**एका परदेशी महिलेशी ऑनलाइन मैत्री होते...काही दिवसांतच प्रेमात गुंतून मागणी होते ती 'तशा' व्हिडिओची...पुढे तुमच्याही नकळत तो व्हिडिओ सेव्ह केला जातो. नंतर तो व्हायरल करण्याची भीती दाखवत पैशांची मागणी होऊ लागते. हा प्रकार आहे 'सेक्सटॉर्शन'चा. या नव्या प्रकाराला अनेक तरुण बळी पडताना दिसताहेत.**

**केस नं. १**

**रुपेश** (नाव बदललं आहे) व लिंडाची (फेक खातं) सोशल मीडियावर मैत्री झाली. पुढे त्यांचं प्रेमात रूपांतर झालं. काही महिन्यांनी दोघांनीही व्हिडिओ कॉलिंगच्या माध्यमातून एकमेकांना निर्वस्त्र (न्यूड) पाहण्याची इच्छा व्यक्त केली. रुपेशहीही तिच्या अकाऊंटवरील सुंदर फोटोला भुलून या कॉलसाठी तयार झाला. लिंडानं एका पॉर्नसाइटवरून व्हिडिओ डाऊनलोड करून तो स्वतःचा म्हणून रुपेशला दाखवला तर दुसरीकडे रुपेशचा 'तो' व्हिडिओ मात्र चित्रित केला जात होता. काही दिवसांतच रुपेशला अनोळखी नंबरवरून तो व्हिडिओ पाठवण्यात आला. पैशांची मागणी करून ते न दिल्यास व्हिडिओ व्हायरल करण्याची धमकी देण्यात आली.

**केस नं. २**

**लेखा** व अभिषेक (नावं बदलली आहेत) दोघेही सहा महिने रिलेशनशिपमध्ये होते. दोघांनीही एकमेकांच्या संमतीनं शारीरिक संबंध ठेवले. सुरक्षिततेच्या नावाखाली लेखानं अभिषेकच्या नकळत छोट्या स्पाय कॅमेराच्या मदतीनं ते खासगी क्षण चित्रित केले. पण, काही दिवसांनी अभिषेकला तो व्हिडिओ दाखवून पैशांसाठी ब्लॅकमेल करण्यात आलं.

**केस नं. ३**

**प्रणय** (नाव बदललं आहे) नेहमीप्रमाणे लॅपटॉपवर काम करत होता. याआधी एका लिंकमधून त्याच्या लॅपटॉपमध्ये स्पाय वेअरनं (व्हायरस) शिरकाव केला होता. लॅपटॉप तसाच चालू ठेवून आंघोळीच्या निमित्तानं प्रणय उठला. नंतर त्याच्या नकळत कपडे बदलतानाचं चित्रीकरण लॅपटॉपमध्ये होत होतं. काही दिवसांत त्याला या व्हिडिओचा मेल पाठवत पैशांची मागणी केली गेली.

अशा प्रकारे ब्लॅकमेल करून खंडणी मागण्याच्या (सेक्सटॉर्शन) घटना वाढत असून, अनेक तरुण मंडळी या खंडणीच्या नव्या प्रकाराला बळी पडत आहेत. सेक्सटॉर्शन म्हणजे सोप्या भाषेत सांगायचं तर, एखाद्याचे खासगी फोटो आणि व्हिडिओ मिळवून, ते दाखवून त्या व्यक्तीकडे पैशांची मागणी केली जाते. अनेक परदेशी महिला भारतीय तरुणांना प्रेमाच्या जाळ्यात ओढून आपल्या कमाईचं साधन बनवत आहेत. सायबरतज्ज्ञांच्या मते, सेक्सटॉर्शनच्या प्रकारात महिलांपेक्षा पुरुषांना फसवणं सोपं जात असल्यानं पुरुष जास्त शिकार बनत आहेत. याशिवाय फेक सेक्सटॉर्शन, म्हणजेच 'तुम्ही काल रात्री पॉर्नसाइटवर सर्फिंग करत होतात. त्याची माहिती आम्ही कुटुंबियांना देऊ' अशी धमकी देऊन पैशांची मागणी केली जाते. भारतात प्रत्येक वर्षी हजारो तरुणांना सेक्सटॉर्शनमधून लक्ष्य केलं जातं. हे तरुण पोलिसांकडे जायलाही घाबरतात. काहींच्या मनात तर आत्महत्येचा विचार येऊ लागतो. या घटनांबाबत समुपदेशक सोनाली पाटणकर म्हणल्या, 'क्षणिक सुखाच्या मागे पळणारी तरुण पिढी यामध्ये दिसते. एखाद्या व्यक्तीबद्दल आपल्याला संपूर्ण माहिती नसताना त्यांच्यासमोर (वेबकॅम समोर) निर्वस्त्र होणं किंवा तुमचे खासगी क्षण चित्रित करणं हे चुकीचंच आहे.'



**सेक्सटॉर्शनच्या घटनांमध्ये पैसे कमावणं हा एकमेव उद्देश या परदेशी महिलांचा असतो. रिलेशनशिपबद्दल त्यांना काहीही वाटत नसतं. त्यामुळे सोशल मीडियावर झालेल्या मैत्रीतून हे पाऊल उचलणं धोक्याचं आहे. अशा प्रसंगात फसवणूक झाल्यास कुठलंही चुकीचं पाऊल न उचलता कौन्सिलरशी संपर्क साधावा आणि पोलिसांकडे तक्रार दाखल करावी.**

– **रितेश भाटिया**, सायबर क्राईम इन्व्हेस्टिगेटर

### हे देखील धोक्याचे...

सायबरतज्ज्ञांकडे आलेल्या एका प्रकरणामध्ये, मुलगा-मुलगी दोघांनीही परस्परसंमतीनं जवळ येण्याचा निर्णय घेतला. दोघांनीही हे खासगी क्षण चित्रित करण्याचं ठरवलं. चार्जिंगसाठी उपयुक्त असलेल्या स्टँडवर मोबाइल ठेवून व्हिडिओ तयार होत होता. त्याचवेळी गुगल ड्राइव्हवर मोबाइल सिंक होऊन व्हिडिओ सेव्ह झाला. दुर्दैवानं मुलाचं खातं हॅक झालं आणि मोबाइलमधला व्हिडिओ लीक झाला.